# <u>नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर</u>

<u>वाचावे</u> :- १) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, साकीनाका पोलिस ठाणे, मुंबई यांचेकडून दिनांक १७/१०/२०११ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाचे पत्र क्र क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७२/२०११/जा.८३९ दिनांक २०/१०/२०११, ०७/१२/२०११, १२/०१/२०१२ व २१/०१/२०१२.

३) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, साकीनाका पोलिस ठाणे, मुंबई यांचेकडून दिनांक ३१/०१/२०१२ व ०१/०२/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल.

४) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७२/२०११/जा.९७ दिनांक २३/०२/२०१२, १६/०३/२०१२ व ०२/०४/२०१२.

५) ॲड. श्री. एम.आर. पांडीया यांचे मे.रिजन्सी गॅसच्या वतीने ई परिमंडळामार्फत दिनांक ०२/०३/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त लेखी निवेदन.

६) मे. अंजली गॅस सर्व्हिस व हिरो होंडा मोटार सायकल क्र. एमएच-०३-अेक्यु-७०१४ चे मालक यांचे दि.१३/०३/१२ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

७) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, साकीनाका पोलिस ठाणे यांचे दिनांक १३/०३/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त लेखी अभिवेदन.

८) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, साकीनाका पोलिस ठाणे यांचे दि. २८/०३/१२ रोजीचे लेखी अभिवेदन.

९) दिलीप जयंतीलाल अडीया यांचे स्वतंत्र व रिजेन्सी गॅसचे तथा ट्रक क्र. एमएच-०४-बीयु-७८९६, थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-वायअे-१७६६, टेम्पो क्र.एमएच-०२-वायअे-७५०४, थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२- वायअे-२०५८, थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-टी-६६६२, थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-एक्सअे-४००७, थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-४४५८ चे मालक नरेंद्र लाल तेजवानी यांचे दिनांक २८/०३/२०१२ रोजीचे संयुक्त लेखी निवेदन.

१०) गोविंद वामन तुरकुंडे यांचे दिनांक ३१/०३/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त लेखी निवेदन.

११) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई यांचे दिनांक १८/०४/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अहवाल.

१२) या कार्यालयाचे पत्र क्र क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७२/२०११/जा.३१८ दिनांक १४/०५/२०१२.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७२/२०११/जा. ६७६
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज. टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक :२६ /०९/२०१२.

## <u>आ दे श</u>

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

साकीनाका पोलिस ठाणेच्या हद्दीतील गाळा नं. २५, गुलशन इस्टेट, अंधेरी, घाटकोपर लिंक रोड, साकीनाका, मुंबई - ७२ या ठिकाणी फिरोज नावाचा इसम हा शासन दराने गिन्हाईकांना घरगुती वापरासाठी वितरीत होणाऱ्या गॅस सिलेंडरचा मोठ्या प्रमाणात विनापरवाना अवैधरित्या साठा करुन ठेवला असून, सदर ठिकाणी तो त्याच्या साथीदारासह घरगुती वापरण्यात येण्याऱ्या सिलेंडरच्या टाकीमधून वॉलच्या सहाय्याने गॅस काढून सदर गॅस वॉलच्या सहाय्याने व्यवसायीक टाकीमध्ये भरुन सदर टाक्या गिन्हाईकांना विक्रीसाठी तयार करुन ठेवले आहेत. तसेच सदर ठिकाणी घरगुती वापरण्यात येणाऱ्या सिलेंडरचा दोन टाक्यामधून वॉलच्या सहाय्याने गॅस काढुन तिसऱ्या घरगुती वापरण्यात येणाऱ्या टाकीमध्ये कमी प्रमाणात गॅस भरुन सदर टाक्या गिन्हाईकांना विक्रीसाठी तयार करुन सदर ठिकाणी विनापरवाना गॅस सिलेंडर रिफेलिंग करण्याचे अनधिकृत काम चालू आहे, अशी माहिती दि.१०/०५/२०११ रोजी गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई यांना मिळाल्यावरुन तेथील पोलिस पथकातील अधिकारी व अंमलदार तसेच पंच व शिधावाटप निरिक्षक असे उक्त ठिकाणी पोहचले.

वर नमूद गाळ्यामध्ये पोलिस पथक, पंच व शिधावाटप निरिक्षक यांनी प्रवेश केला असता, सदर गाळ्यामध्ये उत्तरेस तोंड करुन एक टेम्पो क्र. एमएच-०३-अेएच-१२९२ उभा होता. सदर टेम्पोच्या पाठीमागील बाजूस लाकडी प्लायवुडचे पार्टीशन असून सदर पार्टीशनच्या दरवाज्यामधून पथकाने आत प्रवेश केला असता, एक इसम व्यवसायीक गॅस टाकी खाली ठेवून त्या टाकीच्या तोंडामध्ये लोंखडी वॉल टाकून वॉलच्या तोंडास घरगुती वापरण्यात येणारे भरलेले सिलेंडर उलटे करुन घरगुती वापरणात येणारा सिलेंडरच्या टाकीमधून गॅस व्यवसायीक सिलेंडरमध्ये भरतांना दिसून आला. तेथे शेजारीच दुसरा इसम भरलेल्या व्यवसायीक सिलेंडरच्या टाकीच्या तोंडास एच.पी. कंपनीचे बनावट प्लास्टिक सिल गरम पाणी टाकून चिटकवित असतांना मिळून आला. तिसरा इसम घरगुती वापराच्या भरलेल्या सिलेंडरमधून घरगुती वापराच्याच रिकाम्या सिलेंडरमध्ये वॉलच्या सहाय्याने गॅस भरत असतांना दिसून आला. सहाय्यक पोलिस आयुक्त श्री. वसंत ढोबडे यांनी तीन्ही इसमांना त्यांची कृती थांबविण्यास सांगून सदर इसमांकडे त्यांची स्वतःची व पथकातील सदस्यांची ओळखपत्रे दाखवून ओळख करुन दिली व येण्याचा उद्देश समजावून सांगितला. सदर इसमांना त्यांची नांवे विचारली असता, त्यांनी त्यांची नांवे १) मोहम्मद इसाक मोहम्मद इर्षाद खान, २) सिकंदर अस्लम खान व ३) मंहमद अतिक मोहम्मद अक्रम खान अशी सांगितली. सदर कारवाई चालू असतांना एक पिवळ्या रंगाचा थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-४४५८ हा सदर गोडावून समोर घरगुती वापरण्यात येणाऱ्या गॅस सिलेंडरच्या भरलेल्या टाक्या घेऊन आला. सदर टेम्पोमधील दोन इसम टेम्पोमधील भरलेल्या गॅस सिलेंडरच्या टाक्या गोडावूनमध्ये खाली करु लागले, सदर इसमांना त्यांची कृती थांबविण्यास सांगून त्यांची नांवे विचारली असता, त्यांनी त्यांची नांवे गोपाळ भाकरराम बिषनोई व रामस्वरुप

RATIONING & DIRE... HEAD OFFICE MUMBAI

बलवंतराम बिष्नोई अशी सांगितली. सदर दोन्ही इसम व वर नमूद गाळ्यामधील तीन इसम याना सदर गॅस सिलेंडरबाबत कागदपत्रांची विचारणा केली असता, त्यांच्याकडे कसलीही कागदपत्रे मिळून आली नाहीत. सदर कारवाई चालू असताना दुसरा थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०३-एन-८८९८ हा घरगुती वापरण्याच्या सिलेंडरच्या टाक्या भरुन सदर ठिकाणी आला. पोलिसांनी सदर टेम्पो चालकास टेम्पो थांबविल्यानंतर जवळ बोलाविले असता, सदर टेम्पो चालक पोलिसांना बघून टेम्पो गोडावून समोर उभा करुन पळून गेला. सदर गोडावूनमधील हजर असलेल्या इसमांची संमतीने गोडावूनची तपासणी केली असता, सदर गोडावूनमध्ये गॅस सिलेंडर, दुसऱ्या सिलेंडरमध्ये भरण्याकासी लागणारे साहित्य व इतर माल मिळून आला. त्याचे वर्णन खालील प्रमाणे,

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०३-अेएच-१२९२ | १ नग | ९०,०००/- |
| २ | उक्त टेम्पोमधील भारत गॅस कंपनीचे घरगुती वापरण्यात येणारे गॅसने भरलेले २२ सिलेंडर (१४ किलो वजनाचे) | २२ नग | ३५,२००/- |
| ३ | थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-४४५८ (रिजेन्सी गॅस वितरक यांचा) | १ नग | ९०,०००/- |
| ४ | उक्त टेम्पोमधील भारत गॅस कंपनीचे घरगुती वापरण्यात येणारे गॅसने भरलेले २५ गॅस सिलेंडर (१४ किलो वजनाचे) | २५ नग | ४०,०००/- |
| ५ | थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०३-एन-८८९८ (अंजली गॅस सर्व्हिस यांचा) | १ नग | ९५,०००/- |
| ६ | उक्त टेम्पोमधील भारत गॅस कंपनीचे घरगुती वापरण्यात येणारे गॅसचे रिकामे एकूण १९ सिलेंडर टाक्या व सदर कंपनीचे गॅसने भरलेल्या १४ किलो वजनाच्या दोन टाक्या | २१ नग | २६,९५०/- |
| | एल.जी. कंपनीचे १२ किलो वजनाचे १० रिकामे सिलेंडर बाटला | १० नग | ३,५००/- |
| | एल.जी. कंपनीचे १७ किलो वजनाचे ७ रिकामे सिलेंडर बाटला | ७ नग | ७,०००/- |
| | एल.जी. कंपनीचे १४ किलो वजनाचे २ भरलेले सिलेंडर बाटला व १ रिकामा सिलेंडर बाटला | ३ नग | २,०५०/- |
| १० | गॅस पॉईंट कंपनीचे १२ किलो वजनाचे २२ रिकामे सिलेंडर बाटला व १ भरलेला सिलेंडर बाटला | २३ नग | ८,५००/- |
| ११ | गॅस पॉईंट कंपनीचे १५ किलो वजनाचे ५ रिकामे सिलेंडर बाटला | ५ नग | ५,०००/- |
| १२ | गॅस पॉईंट कंपनीचे १७ किलो वजनाचे ७ रिकामे सिलेंडर बाटला | ७ नग | ७,०००/- |
| १३ | एच.पी. कंपनीचे १९ किलो वजनाचे ५ रिकामे व्यवसायीक सिलेंडर बाटला | ५ नग | ८,५००/- |
| १४ | बी.पी. कंपनीचे १९ किलो वजनाचे २ रिकामे व्यवसायीक सिलेंडर बाटला | २ नग | ३,४००/- |
| १५ | गॅस भरण्यासाठी लागणारे साहित्य व वाहून नेण्यासाठी २ ॲटलॅस कंपनीच्या सायकली, १२ किलो वजनाचे गॅस भरण्यासाठी लागणारे ४ | - | ७,५७५/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | रिफेलिंग मशीन, १४ किलो वजनाचे गॅस भरण्यासाठी लागणारे १४ रिफेलिंग मशिन, SKN इंडस्ट्रिज या कंपनीचे पाईप जोडलेले रेग्युलेटर व एक सिगंल बर्नर असलेली गॅस शेगडी, एच.पी. कंपनीचे प्लॅस्टिक पेपरचे ५० सिल, काळ्या रंगाचे ५० रबरी वॉल तसेच बी.पी. कंपनीचे पांढऱ्या रंगाचे प्लॅस्टिकचे २५ सिल | | |
| १६ | हिरो होंडा मोटार सायकल क्र. एमएच-०३-अेक्यु-७०१४ | १ नग | ४०,०००/- |
| | | एकूण | ४,६१,६७५/- |

तद्नंतर पोलिसांनी उपस्थित इसमांकडे केलेल्या अधिक चौकशीमध्ये, वर नमूद सुरुवातीस टेम्पो घेऊन आलेला इसम नामे गोपाळ भाकरराम बिषनोई याने त्याचे खरे नाव श्रावण बळवंतराम बिषनोई असे असल्याचे सांगितले. वर नमूद इसमांना पोलिसांनी पुढील कारवाईकरितां ताब्यात घेऊन त्यापैकी मोहम्मद अतिक मोहम्मद अक्रम खान यास विचारपूस केली असता, त्याने सांगितले की, त्याचे गोडावूनमध्ये मिळालेले भारत गॅसचे सिलेंडर त्याने अंजली गॅस सर्व्हिस व रिजन्सी गॅस सर्व्हिस या दोन्ही गॅस एजन्सीच्या गोडावूनमधून आणल्याचे सांगितले. अंजली गॅस सर्व्हिस येथे काम करणारा डिलिव्हरी सुपरवायझर चेतन गोविंद तुरकुंडे हा त्यास पाहिजे तेवढे सिलेंडर देत असल्याचे सांगून त्याच्या फोन वरुन चेतन यास बोलावून घेतले असता, चेतन गोविंद तुरकुंडे याने तो नेहमीच मोहम्मद अतिक मोहम्मद अक्रम खान यास सिलेंडर देत असल्याचे कबूल केले. तसेच ताब्यात घेतलेले इसम नामे रामस्वरुप बिषनोई व श्रावण बिषनोई यांच्याकडे अधिक विचारपूस केली असता, ते रिजन्सी गॅस सर्व्हिस या गॅस एजन्सीमध्ये काम करीत असून सदरचे सिलेंडर त्यांनी रिजन्सी गॅस एजन्सीच्या मरोळ पाईप लाईन येथे गोडावूनमधून आणले असल्याचे सांगितले. सदर कारवाई चालू असतांना सदर गाळ्याचे मालक नामे राममिलन हरिशंकर शुक्ला हे हजर झाल्याने त्यांना गोडावूनबाबत विचारपूस केली असता, त्याने सदरचे गोडावून फिरोज नामे इसमास दहा दिवसांपूर्वी गॅस रिफीलिंग करण्यासाठी १०,०००/- रुपये महिन्याने भाडयाने दिले असल्याचे सांगितले. त्यास सदरचे गॅस रिफिलिंग करण्याचे काम अवैध व मानवी जीवनास धोका निर्माण होईल हे माहित असतांना सुध्दा त्याने गोडावून कोणताही करारनामा न करता फिरोज यास भाडयाने दिले व गुन्हा करण्यास मदत केली. म्हणून त्यास पोलिसांनी पुढील कारवाईकरिता ताब्यात घेतले.

अंजली गॅसचे सुपरवायझर चेतन गोविंद तुरकुंडे हा सदर कामासाठी त्याची लाल रंगाची हिरो होंडा कंपनीची मोटार सायकल क्र. एमएच-०३-अेक्यु-७०१४ या मोटार सायकलचा वापर करीत असल्याने पोलिसांनी सदर मोटार सायकल पुढील कारवाईकरिता ताब्यात घेतली व सदर जप्त मुद्देमालावर पोलिस व पंचाचे सह्याचे लेबल लावण्यात आले. तसेच सदरचा माल वाहतूक करण्यास अवघड असल्याने व धोकादायक असल्याने तात्पुरता गोडावूनमध्ये ठेवून सदरचे गोडावून सिल करण्यात आले आहे.

सदर जप्त केलेला मुद्देमाल अंजली गॅस सर्व्हिस व रिजन्सी गॅस सर्व्हिस यांच्या गोडावूनमधून आणला असल्याचे निष्पन्न झाल्याने पोलिस, पंच व अंजली गॅसचे सुपरवायझर चेतन तुरकुंडे व रिजन्सी गॅसचे डिलेव्हरी मॅन श्रावण बिषनोई यांना घेऊन अंजली गॅस एजन्सी, भारत गॅस गोडावून, कुरेन रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - ९३ येथे आल्यानंतर पोलिस, पंच व पथक यांनी गोडावूनमध्ये प्रवेश केला असता, गोडावूनमध्ये एक इसम हजर होता. सहाय्यक पोलिस आयुक्त वसंत ढोबळे यांनी त्यांची व पथकातील सदस्यांची ओळखपत्र दाखवून ओळख करुन दिली व येण्याचा उद्देश समजावून सांगितला. सदर इसमास नांव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नांव दिलीप जयंतीलाल अडिया असे सांगितले. सदर इसमाच्या संमतीने गोडावूनची तपासणी केली असता. गोडावूनमध्ये अंजली गॅस एजन्सीचा खालील वर्णनाचा माल मिळून आला. सदर माल तात्पुरत्या स्वरुपात जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | भारत गॅस कंपनीचे १४ किलो वजनाचे घरगुती वापरण्यासाठी लागणारे २०९३ रिकामे सिलेंडर बाटला | २०९३ नग | २६,१६,२५०/- |
| २ | भारत गॅस कंपनीचे १४ किलो वजनाचे भरलेले घरगुती वापराचे ३७२ सिलेंडर बाटला | ३७२ नग | ५,९५,२००/- |
| ३ | भारत गॅस कंपनीचे १९ किलो वजनाचे भरलेले घरगुती वापरासाठी असणारे १८६ सिलेंडर बाटला | १८६ नग | ५,०९,०८२/- |
| ४ | भारत गॅस कंपनीचे व्यवसायीक वापरासाठी लागणारे १९ किलो वजनाचे ५४३ रिकामे सिलेंडर | ५४३ नग | ८,१४,५००/- |
| | | एकूण | ४५,३५,०३२/- |

तसेच अंजली गॅस सर्व्हिस शॉप नं. ७, एव्हरजॉय अपार्टमेंट, मरोशी रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - ५९ हे कार्यालय पुढील चौकशीसाठी तात्पुरते सिल करण्यात आलेले आहे.

त्यानंतर पोलिस पंच व पथक असे रिजन्सी गॅस एजन्सीचे गोडावून मरोळ पाईप लाईन रोड, ऑफ अंधेरी कुर्ला रोड, गरुडा बिल्डिंगच्या बाजूस, अंधेरी (पूर्व), मुंबई - ५९ येथे गेले असता. सदर गोडावूनमध्ये एक इसम हजर होता. सहाय्यक पोलिस आयुक्त वसंत ढोबळे यांनी सदर इसमास स्वत:चे व पथकातील सदस्यांचे ओळखपत्र दाखवून ओळख करुन दिली व येण्याचा उद्देश समजावून सांगितला. सदर इसमास पोलिसांनी नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नांव सुनिल पारसनाथ सिंग असे सांगितले. सदर इसमाच्या संमतीने गोडावूनची तपासणी केली असता, गोडावूनमध्ये खालील वर्णनाचा व किंमतीचा मुद्देमाल मिळून आला. सदर मुद्देमाल तात्पुरत्या स्वरुपात जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | भारत गॅस कंपनीचे १४ किलो वजनाचे घरगुती वापरासाठी लागणारे ६५८ रिकामे सिलेंडर | ६५८ नग | ८,२२,५००/- |
| २ | भारत गॅस कंपनीचे १४ किलो वजनाचे घरगुती वापरासाठी लागणारे १७६ भरलेले सिलेंडर | १७६ नग | २,८१,६००/- |
| ३ | भारत गॅस कंपनीचे १९ किलो वजनाचे व्यवसायीक वापरासाठी लागणारे ४३ भरलेले सिलेंडर | ४३ नग | १,१७,६४८/- |
| ४ | भारत गॅस कंपनीचे १९ किलो वजनाचे व्यवसायीक वापरासाठी लागणारे १८६ रिकामे सिलेंडर | १८६ नग | २,७९,०००/- |
| ५ | भारत गॅस कंपनीचे १९ किलो वजनाचे कटिंगसाठी व्यवसायीक वापरणारे गॅसने भरलेले १६ सिलेंडर | १६ नग | ४७,२००/- |
| ६ | ट्रक क्र.एमएच-०४-बीयु-७८९६ | १ नग | ३,००,०००/- |
| ७ | उक्त ट्रकमधील भारत गॅस कंपनीचे १४ किलो वजनाचे घरगुती वापराचे ३०० गॅस सिलेंडर | ३०० नग | ३,७५,०००/- |
| ८ | थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-वायअे-१७६६ | १ नग | ७०,०००/- |
| ९ | उक्त टेम्पोमधील भारत गॅस कंपनीचे १४ किलो वजनाचे घरगुती वापराचे २५ गॅस सिलेंडर | २५ नग | ३१,२५०/- |
| १० | टेम्पो क्र.एमएच-०२-वायअे-७५०४ | १ नग | ७०,०००/- |
| ११ | उक्त टेम्पोमधील भारत गॅस कंपनीचे १४ किलो वजनाचे घरगुती वापराचे २० गॅस सिलेंडर | २० नग | २५,०००/- |
| १२ | थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-वायअे-२०५८ | १ नग | ७०,०००/- |
| १३ | उक्त टेम्पोमधील भारत गॅस कंपनीचे १४ किलो वजनाचे घरगुती वापराचे २३ गॅस सिलेंडर | २३ नग | २८,७५०/- |
| १४ | थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-टी-६६६२ | १ नग | ७०,०००/- |
| १५ | उक्त टेम्पोमधील भारत गॅस कंपनीचे १४ किलो वजनाचे घरगुती वापराचे १६ गॅस सिलेंडर | १६ नग | २०,०००/- |
| १६ | थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-एक्सअे-४००७ | १ नग | ७०,०००/- |
| १७ | उक्त टेम्पोमधील भारत गॅस कंपनीचे १४ किलो वजनाचे रिकामे घरगुती वापराचे १५ गॅस सिलेंडर व १९ किलो वजनाचे व्यवसायीक वापराचे ३ भारत गॅस कंपनीचे रिकामे सिलेंडर | १८ नग | १५,२५०/- |
| १८ | ३ थ्री व्हिलर सायकलमध्ये भारत गॅस कंपनीचे १४ किलो वजनाचे घरगुती वापराचे ४८ रिकामे गॅस सिलेंडर व १९ किलो वजनाचे व्यवसायीक वापराचे ७ रिकामे सिलेंडर | ५५ नग | ८८,५००/- |
| | | एकूण | २७,८१,६९८/- |

0007 येणे प्रमाणे तिन्ही गोडावूनमधून असा एकूण रुपये ७७,८६,४०५/- किंमतीचा मुद्देमाल जागीच पंचनामा करुन त्यावर पोलिस व पंचांच्या सह्याचे लेबल लावून ताबा घेण्यात आला. सदर ठिकाणी पोलिसांनी पंचनाम्या व्यतिरिक्त इतर कोणतीही वस्तू ताब्यात घेतली नाही. त्यानंतर रिजन्सी गॅस एजन्सी शॉप नं. २, जय गणेश अपार्टमेंट, अंधेरी (पूर्व), मुंबई - ५९ हे कार्यालय पुढील चौकशी कामी तात्पुरते सिल करण्यात आले.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबंधितांनी संगणमत करुन शासनाद्वारे ग्राहकांना कमी दरात वितरीत होणारा घरगुती गॅसच्या टाक्यांमधून वॉल्वद्वारे कमी प्रमाणात व्यवसायीक सिलेंडरच्या टाक्यांत विनापरवाना गॅस भरुन सदरचा गॅस हा उच्च प्रतीचा व कंपनीकडून वितरीत होणारा गॅस सिलेंडरचा मुळ सिलेंडर आहे, असे भासवून स्वत:च्या फायद्याकरिता ग्राहकांना विक्रीसाठी साठा करुन ठेवला, त्यामुळे मानवी जिवीतास धोका निर्माण केला, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे दिसून येत असल्याने संबंधितांविरुध्द १) दि लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस (रेग्युलेशन ऑफ सप्लाय ॲण्ड डिस्ट्रीब्यूशन) ऑर्डर २००० चे कलम ३ (अ)(ब), ६ व ७, २) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७ (२), ८ व १० तसेच ३) भा.दं.वि. चे कलम ४२०, २८५ व ३४ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द साकीनाका पोलिस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १८५/२०११ दि.११/०५/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

प्रस्तुत प्रकरणी, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, साकीनाका पोलिस ठाणे यांचे दिनांक १७/१०/२०११ रोजी प्राप्त झालेल्या अहवालासोबत जोडण्यात आलेल्या एफ आय आर, जबाब, पंचनामा यांची सुस्पष्ट छायांकित प्रत प्राप्त करुन घेण्यासाठी या कार्यालयाचे वाचावे क्र. २ अन्वये दिनांक २०/१०/२०११ रोजी पत्र निर्गमित करण्यात आले, सदर प्रकरणी दिनांक ११/०५/२०११ रोजी साकीनाका पोलिस ठाणे येथे संबंधितांविरुध्द गुन्हा दाखल करुन मुद्देमाल जप्त केल्याचे दिसुन येते. तथापी, नमुद गुन्ह्याची माहिती या कार्यालयास दिनांक १७/१०/२०११ रोजीच्या पत्रान्वये इतक्या विलंबाने सादर केल्याचे कारण काय? तसेच वाचावे क्र. २ अन्वये दिनांक २०/१०/२०११ रोजी सादर केलेल्या पत्राच्या अनुषंगाने सुस्पष्ट छायांकित प्रतीही प्राप्त न झाल्यामुळे वरिष्ठ पोलिस निरीक्षक, साकीनाका पोलिस ठाणे यांना दिनांक १३/१२/२०११ रोजी या कार्यालयात समक्ष उपस्थित राहुन विलंबाचा खुलासा सादर करण्यासाठी वाचावे क्र. २ अन्वये दिनांक ०७/१२/२०११ रोजी पत्र निर्गमित करण्यात आले. सदरची आवश्यक माहिती तात्काळ सादर करण्याबाबत सुचित करुनही प्राप्त न झाल्याने वाचावे क्र. २ अन्वये दिनांक १२/०१/२०१२ रोजीच्या पत्रान्वये स्मरणपत्र निर्गमित करण्यात येवून दिनांक १७/०१/२०१२ रोजी या कार्यालयात समक्ष उपस्थित राहण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक, साकीनाका पोलिस ठाणे यांना पुन्हा सुचना देण्यात आल्या.

उपरोक्त नमूद गुन्ह्याची माहिती या कार्यालयास इतक्या विलंबाने सादर केल्याचे कारण काय ? याबाबतचा खुलासा तसेच पत्रासोबत जोडण्यात आलेले एफ.आय.आर., जबाब, पंचनामा यांची सुस्पष्ट छायांकित प्रती समक्ष

8008

उपस्थित राहून सादर केले. नमूद गुन्हा नोंद प्रकरणी करण्यात आलेल्या पंचनाम्याची जप्त मुद्देमालाबाबत तुलानात्मक पडताळणी केली असता, जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाच्या किंमती बाबत साम्यता नसल्याचे आढळून आले. फिर्यादीमध्ये रुपये ४,६९,६७५/- एवढया किमतीचा जप्त मुद्देमाल दर्शविण्यात आले असुन व पंचनाम्यामध्ये एकुण दर्शविलेल्या जप्त मुद्देमालाची बेरीज करता एकुण रुपये ७७,८६,४०५/- किमतीचा मुद्देमाल जप्त केल्याचे दिसुन येते. सदर बाब गंभीर असून जप्त करण्यात आलेले सिलेंडर हे अति ज्वलनशिल असून सुरक्षेच्या दृष्टीने जप्त मुद्देमालाची त्वरीत विल्हेवाट लावणे अगत्याचे असल्याने सदर प्रकरणी तपासी पोलिस अधिकारी यांना मुळ प्रकरणासह स्वयंस्पष्ट अहवाल दिनांक २३/०१/२०१२ रोजी समक्ष उपस्थित राहून सादर करण्याबाबत वाचावे क्र. २ अन्वये दिनांक २१/०१/२०१२ रोजीच्या पत्रान्वये वरिष्ठ पोलिस निरीक्षक, साकीनाका पोलीस ठाणे यांना पुन्हा सुचित करण्यात आले.

तद्‌नंतर वरिष्ठ पोलिस निरीक्षक, साकीनाका पोलिस स्टेशन यांनी वाचावे क्र. ३ व ७ अन्वये सादर केलेले अहवाल व लेखी अभिवेदनामध्ये साकीनाका पोलिस ठाणे शिवाय अंधेरी पोलिस ठाणे अंतर्गत मे. अंजली गॅस सर्व्हिसचे कार्यालय व गोडाऊन मधील तात्पुरत्या स्वरुपात सिल करण्यात आलेला रु. ४५,३५,०३२/- किंमतीचा मुददेमाल तसेच एम.आय.डी.सी. पोलिस ठाणे अंतर्गत मे. रिजन्सी गॅस सर्व्हिसचे कार्यालय व गोडाऊन मधील तात्पुरत्या स्वरुपात सिल करण्यात आलेला रु. २७,८१,६९८/- किंमतीचा मुद्देमाल गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई यांचे आदेशाने खोलण्यात आले. त्यानुसार ठाणे दैनंदिनी क्र. २५/२०११ दिनांक १४/०५/२०११ रोजी नोंदी घेऊन रु. ७३,१६,७३०/- किंमतीचा मुद्देमाल सिलमुक्त करण्याची कार्यवाही करुन नमुद गुन्ह्यातील उर्वरीत शिल्लक असलेला रु. ४,६९,६७५/- किंमतीचा मुद्देमाल हा आजमितीस घटनास्थळी असलेल्या गोदामात जप्त असल्याचे नमुद केले आहे. सबब, सदरचा जप्त मुद्देमाल हा ज्वलनशिल असल्याने संबंधितांना तत्पूर्वी वाचावे क्र. ४ अन्वये दिनांक २३/०२/२०१२ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असुन सद्यस्थितीत नमुद गुन्ह्यातील शिल्लक असलेल्या रु. ४,६९,६७५/- किंमतीच्या जप्त मुद्देमालाच्या विल्हेवाटीच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु करण्यात आली.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलिस निरिक्षक, साकीनाका पोलिस ठाणे, मुंबई यांनी केलेली आहे. सबब, साकीनाका पोलिस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १८५/२०११ दि.११/०५/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेला उपरोक्त मुद्देमाल शासनजमा का करण्यात येऊ नये, याबाबत वाचावे क्र. ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी म्हणून या कार्यालयात दिनांक १३/०३/२०१२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक १३/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. रिजन्सी गॅस एजन्सीच्या वतीने अॅड. एम.आर. पांडीया हे वकालतनाम्यासह उपस्थित राहिले व यापूर्वीच टपालामार्फत वाचावे क्र. ५ अन्वये सादर केलेले लेखी निवेदन कायम असल्याचे सांगितले. तसेच सदर सुनावणीस मे. रिजन्सी गॅस सर्व्हिसचे भागीदार नरेंद्र तेजवानी, मे. अंजली गॅस सर्व्हिसच्या वतीने प्राधिकारपत्रासह कुणाल सुरेश बर्डे व हिरो होंडा मोटार सायकल क्र. एमएच-०३-अेक्यु-७०१४ चे मालक म्हणून लक्ष्मण गोविंद तुरकुंडे हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ६ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली. तथापी, सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी व गुन्हे नियंत्रण शाखा, मुंबईचे अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २८/०३/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २८/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस साकीनाका पोलिस ठाणेचे सहाय्यक पोलिस उपनिरिक्षक श्री. रविंद्र यादव नागरे हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र ८ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. सदर सुनावणीस मे. रिजेन्सी गॅसचे तथा ट्रक क्र.एमएच-०४-बीयु-७८९६, थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-वायअे-१७६६, टेम्पो क्र.एमएच-०२-वायअे-७५०४, थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२- वायअे-२०५८, थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-टी-६६६२, थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-एक्सअे-४००७ व थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-४४५८ चे मालक नरेंद्र लाल तेजवानी तसेच दिलीप जयंतीलाल अडीया यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ९ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली. सदर सुनावणीस मे. रिजन्सी गॅस एजन्सीचे मॅनेजर सुनिल पारसनाथ सिंग, श्रावण बळवंतराम बिषनोई, रामस्वरुप बळवंतराम बिषनोई, मोहमद अतिक मोहम्मद अक्रम खान, थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०३-एन-८८९८ चे चालक तथा अंजली गॅस सर्व्हिसचे डिलिव्हरी मॅन चेतन गोविंद तुरकुंडे हे उपस्थित राहिले. तथापी सदर सुनावणीसही गुन्हे नियंत्रण शाखा, मुंबईचे अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक ०८/०५/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०८/०५/२०१२ रोजीच्या सुनावणीसही गुन्हे नियंत्रण शाखा, मुंबईचे अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत. तथापी, वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई यांनी टपालामार्फत वाचावे क्र. ११ अन्वये खुलासा वजा अहवाल सादर केले. सदर खुलासा वजा अहवाल यामध्ये त्यांनी त्यांच्या स्तरावर मुक्त केलेल्या अशतः मुद्देमालाच्याबाबत समाधानकारक खुलासा सादर केला नाही. सबब, वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई यांना समक्ष उपस्थित राहून खुलासा सादर करण्यासाठी या कार्यालयाचे वाचावे क्र. १२ अन्वये पत्र निर्गमित करण्यात आले.

सबब, प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

युक्तिवाद :-

दिनांक १३/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित ॲड. श्री. एम.आर. पांडीया यांचे मे. रिजन्सी गॅसच्या वतीने टपालामार्फत प्राप्त लेखी निवेदनात, नमुद गुन्ह्यात जप्त करण्यात आलेले त्यांची वाहने व २५ पूर्ण भरलेले गॅस सिलेंडर हे साकीनाका पोलिस ठाणे येथे जप्त असुन सदर मुद्देमालाची त्यांना गरज असल्याने ते योग्य अटी व शर्तीवर मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले. तसेच मे. रिजन्सी गॅस सर्व्हिसचे भागीदार नरेंद्र तेजवानी यांनी सादर केलेल्या स्वतंत्र निवेदनात, दिनांक १०/०५/२०१२ रोजी गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई यांच्या पथकानी टेम्पो क्र. ०२-वायअे-४४५८ पकडला. त्या टेम्पोमध्ये २५ फुल सिलेंडर होते. जे डिलिव्हरी बॉय श्रावण बळवंतराम बिषनोई आणि त्याचा मदतनिस गोपाळ भाकरराम बिषनोई डिलिवरी करण्यासाठी जात होते. पहिल्या ट्रिपमध्ये त्याने २५ सिलेंडरची डिलेव्हरी केली होती. त्यांचे ग्राहक क्रमांक त्यांनी माहितीसाठी सोबत जोडले आहे. पूर्ण दिवसाच्या डिलीवरीसाठी त्याच्याजवळ दुसरी ५५ ते ५७ कार्ड जमा होती. दुसरी ट्रिप भरुन तो गोडावूनमधून निघाला (२५ फुल सिलेंडर) आणि थोड्या वेळात त्याला फोन आला त्याला लग्नासाठी सिलेंडरची जरुरत आहे मिळतील का ? त्याने नकार दिला. परतु दोन ते तीन वेळा त्याला अशाच प्रकारचे फोन आले. पुन्हा त्याने नकार देताच त्याला त्याने सांगितले तू तेथे आहेत तेथेच थांब. त्यावेळेस तो सहार रोड पी ॲण्ड टी कॉलनीच्या गेट जवळ होता आणि त्याच रोडने पुढे बामन वाडा ह्या भागात डिलीवरीसाठी जात होता. रस्त्यात उभे राहून ट्रॅफिक होऊ नये म्हणून फोन आलेल्या माणसाच्या धमकावणीला घाबरुन तो कॉलनीच्या गेटच्या आत जाऊन थांबताच क्षणी पथकाने त्याला अटक केली व त्याची गाडी, गाडीतील २५ फुल सिलेंडर व त्याच्या जवळ असलेली डिलीवरी केलेली २५ कार्ड व डिलीवरी करण्यासाठी घेतलेली ५५ ते ५७ कार्ड जप्त केली. ह्या संदर्भात जर आपणांस अधिक माहिती काढायची असल्यास मोबाईल फोन ट्रॅक सिस्टममधून आपण अधिक माहिती काढू शकता अशी विनंती केली आहे. त्यांच्या कंपनीचे जेवढे टेम्पो आहेत ते पूर्णपणे ग्राहकांना सिलेंडरची डिलीवरी देण्यासाठीच माणसांना दिलेले आहेत आणि जेणेकरुन त्यांची कामे कमी कष्टप्रत होतील आणि ग्राहकांना सुध्दा सिलेंडर लवकर आणि वेळेवर पोहाचतील. जप्त केलेले सिलेंडर हे भारत पेट्रोलियम लिमिटेड (भारत सरकारचा उपक्रम) ह्यांची प्रॉपर्टी आहे. तरी त्यांच्या विनंतीचा मान ठेवून परत करण्याची कृपा करावी त्याचप्रमाणे टेंम्पो सुध्दा परत करावा जेणेकरुन डिलेव्हरीबॉय त्याचा वापर करु शकेल अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १३/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. अंजली गॅस सर्व्हिसच्या प्राधिकारपत्रासह कुणाल सुरेश बर्डे यांनी मे. अंजली गॅस सर्व्हिसचे मालक सुरेश प्रभाकर बर्डे यांच्यावतीने सादर केलेल्या निवेदनात, ते अंजली गॅस सर्विस, मरोळ, अंधेरी (पूर्व) चा मालक आहे. दिनांक ११/०५/२०११ रोजी त्यांचे भारत गॅसचे मरोळ कार्यालय आणि भारत पेट्रोलियमचे चकाला, अंधेरी (पूर्व) येथील सिलेंडरचे गोदाम पोलिस कारवाई दरम्यान

तात्पुरते सिल करण्यात आले होते. परंतू दिनांक १४/०५/२०११ रोजी सर्व पोलिस तपासानंतर त्यांचे मरोळ कार्यालय पूर्ववत चालू करण्यात आले आणि कंपनीचे गोदाममधील जप्त करण्यात आलेला त्यांचा माल (सिलेंडर) गहाळ न होता त्यांना परत मिळाला आहे. त्याबद्दल त्यांची कोणती तक्रार नाही. परंतू त्यांच्या भारत गॅस कंपनीचे (अंजली गॅस सर्विस) २१ गॅस सिलेंडर (१४.२ किलो) हे साकीनाका पोलिस हद्दीत असलेल्या अनधिकृत गोदामामध्ये त्यांच्या नोकराने त्यांना माहित नसताना बेकायदेशिररित्या देण्यात आले होते. तेव्हा सदर भारत गॅस सिलेंडर त्यांना परत मिळावेत, अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १३/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित हिरो होंडा मोटार सायकल क्र. एमएच-०३-अेक्यु-७०१४ चे मालक म्हणून लक्ष्मण गोविंद तुरकुंडे यांनी युक्तीवाद केला की, त्याची मालकी हक्काची व नावे असलेली हिरो होंडा मोटर सायकल साकीनाका पोलिस ठाणे यांच्या हद्दीत जप्त करण्यात आली होती. ती त्यास परत मिळावी अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, साकीनाका पोलिस ठाणे यांचे दिनांक १४/०३/२०१२ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या लेखी अभिवेदनात, प्रस्तूत प्रकरणी साकीनाका पोलिस ठाणे शिवाय अंधेरी व एम.आय.डी.सी. पोलिस ठाणे हद्दीत अंजली व रिजेन्सी या गॅस सिलेंडरचे गोडावून वरील पथकाने तात्पुरते सिल केले असून त्या ठिकाणी संबंधीत पोलिस ठाणेचा पहारा नेमलेला होता. सदर अंजली गॅस सर्व्हिस व रिजेन्सी गॅस सर्व्हिस यांना लावण्यात आलेले सिल सी.बी. कंट्रोल, मुंबई यांच्या आदेशाने खोलण्यात आले आहे, त्याप्रमाणे ठाणे दैनदिनी क्र. २५/२०११ दिनांक १४/०५/२०११ प्रमाणे नोंद घेण्यात आली आहे.

सदर प्रकरणातील आरोपी मोहम्मद इसाक मोहम्मद इर्षाद खान उर्फ पठाण, मोहम्मद इसाक मोहम्मद इर्शाद खान व मोहम्मद आतीक मोहम्मद अक्रम खान हे आरोपी त्यांच्या राहत्या गावी अनुक्रमे फरीदाबाद, उत्तर प्रदेश, फरीदाबाद, उत्तर प्रदेश व बलरामपुर, उत्तरप्रदेश येथे गेले असल्याचे व परत कधी येणार याची माहिती नसल्याचे रज्जीउल्ला अय्यतउल्ला खान यांनी सांगितले. त्यामुळे त्यास नोटीस बजावता आलेली नाही. टेम्पो क्र. एमएच-०३-एएच-१२९२ च्या मालकाचा शोध घेत आहोत, त्यामुळे त्यास नोटीस बजावता आलेली नाही. सदर बाबत तपास चालू आहे. थ्री व्हीलर टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-४४५८ हा रिजेन्सी गॅस सर्व्हिसचा असल्यामुळे सदरचे नोटीस रिजेन्सी गॅस सर्व्हिसचे मालक नरेंद्र लाल तेजवानी यांना बजावण्यात आले आहे. श्रावण बळवतराम बिष्णोई याचा शोध घेतला असता, त्याचे नातेवाईक श्री. राजुराम बळवतराम बिष्णोई यानी सदर आरोपी हा राजस्थान येथे गेला असल्याचे सांगितले, त्यानी पुढील तारीख होण्यास विनंती केली आहे. त्यामुळे त्यास नोटीस बजावता आली नाही. राजस्वरुप बळवतराम बिष्णोई याचा शोध घेतला असता, त्याचे नातेवाईक श्री. राजुराम बळवतराम बिष्णोई यानी सदर आरोपी हा गुजरात येथे नोकरी करीत असल्याचे सांगितले. त्यानी पुढील तारीख

होण्यास विनंती केली आहे. त्यामुळे त्यास नोटीस बजावता आली नाही. थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०३-वायए-८८९८ चे मालक गोविंद तुरकुडे याचा मुलगा लक्ष्मण गोविंद तुरकुडे यांना सदरचे नोटीस बजावण्यात आली आहे. थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०३-वायए-८८९८ चे चालक चेतन गोविंद तुरकुडे याचा भाऊ लक्ष्मण गोविंद तुरकुडे यांना सदरचे नोटीस बजावण्यात आली आहे. अंजली गॅस सर्व्हिसचे मालक सुरेश प्रभाकर बर्डे याच्या कार्यालयात सदरचे नोटीसची बजावणी केली आहे. अंजली गॅस सर्व्हिसचे मॅनेजर दिलीप जयंतीलाल अडीया हे मिळून न आल्याने नोटीस बजावता आली नाही. रिजन्सी गॅस सर्व्हिसचे मालक नरेंद्र लाल तेजवानी व मॅनेजर सुनिल पारसनाथ सिंग यांना नोटीसची बजावणी करण्यात आली आहे. चेतन गोविंद तुरकुडे याचा भाऊ लक्ष्मण गोविंद तुरकुडे यांना सदरचे नोटीस बजावण्यात आले आहे. साकीनाका पोलिस ठाणे स्थळ सिमेतील घटनास्थळावरील बेकायदेशिर गोडावूनचे मालक राममिलन हरीशंकर शुक्ला यानी गाळाचे कागदपत्र सादर केलेली नाहीत. परंतू गुन्ह्याच्यावेळी सदर गाळा त्याच्या ताब्यात मिळून आल्याने त्यांना बजावणीकामी त्याचे राहते निवासस्थान येथे जाऊन चौकशी केली असता, त्याचे भाऊ रामभुवन हरीशंकर शुक्ला यांनी राममिलन हरीशंकर शुक्ला हा गुजरात येथे गेला असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे त्यास नोटीस बजावता आलेली नाही. आरोपी फिरोज अस्लम खान हा अद्याप पाहिजे आरोपी म्हणून सदर गुन्ह्यामध्ये असून त्याचा शोध चालू असल्यामुळे त्यास नोटीस बजावता आलेली नाही. हिरो होंडा मो/सायकल क्र. एमएच-०३-एक्यू-७०१४ चे मालक लक्ष्मण गोविंद तुरकुडे यांना सदरचे नोटीस बजावण्यात आलेली आहे. नोटीस मधील क्र. १८, १९, २०, २१, २२ व २३ मधील नमूद वाहने हि रिजेन्सी गॅस सर्व्हिसच्या ताब्यात असल्यामुळे सदरची नोटीस रिजेन्सी गॅस सर्व्हिसचे मालक नरेंद्र लाल तेजवानी यांना बजावण्यात आले आहे. पाहिजे आरोपी हर्शद अहमद सिध्दीकी याचा शोध घेतला असता, सदर आरोपी मिळून आलेला नाही. सदर आरोपी हा सदर गुन्ह्यात पाहिजे आरोपी आहे. सदर गुन्ह्यतील साकीनाका पोलिस ठाण्याच्या हद्दीतील घटनास्थळावरुन ताब्यात घेण्यात आलेली मालमत्ता हि अद्याप सी.बी. कंट्रोल, गु.अ.वि., मुंबई यांच्या ताब्यात असून, सदर ठिकाणी लावण्यात आलेल्या सिलवर (बंद जागेवर) पोलिसाचा पहारा ठेवण्यात आला आहे. कंट्रोल, गु.अ.वि., मुंबई मार्फत अद्याप प्रत्यक्ष जप्त मालमत्तेचा ताबा देण्यात आलेला नाही. तरी सुरक्षिततेकरीता जप्त मालाची विल्हेवाट लावून, उर्वरीत मालमत्ता हि गुन्ह्यातील पुरावा असल्यामुळे तसेच गुन्ह्यामध्ये दोन आरोपी अद्याप सदर गुन्ह्यात पाहिजे आरोपी आहेत. तसेच गुन्हा अद्याप पोलिस तपासाधिन असल्यामुळे सदरची मालमत्ता संबंधितांना परत करण्यास साकीनाका पोलिस ठाण्यामार्फत सक्त हरकत घेण्यात येत आहे, असे नमूद केले आहे.

दिनांक २८/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस साकीनाका पोलिस ठाणेचे सहाय्यक पोलिस उपनिरिक्षक श्री. रविंद्र यादव नागरे यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांच्या सादर केलेल्या लेखी अभिवेदनात, सुरक्षिततेकरीता जप्त

मुद्देमालाची विल्हेवाट लावण्यात यावी तसेच सदरची मालमत्ता संबंधितांना परत करण्यास सक्त हरकत असल्याचे नमुद आहे.

दिनांक २८/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित दिलीप जयंतीलाल अडीया यांनी युक्तीवाद केला की, तो अंजली गॅस सर्व्हिसचा मॅनेजर नसून मे. सनबीम गॅस एजन्सी या गोदामाचा गोदाम मॅनेजर आहे. त्यामुळे अंजली गॅस सर्व्हिसशी त्याचा कोणताही संबध नाही, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २८/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित ट्रक क्र. एमएच-०४-बीयु-७८९६, थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-वायअे-१७६६, टेम्पो क्र.एमएच-०२-वायअे-७५०४, थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२- वायअे-२०५८, थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-टी-६६६२, थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-एक्सअे-४००७, थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-४४५८ तसेच मे. रिजेन्सी गॅसचे मालक नरेंद्र लाल तेजवानी यांनी युक्तीवाद केला की, तो रिजन्सी गॅसचा मालक असून दिनांक १०/०५/२०१२ रोजी रिजन्सी गॅसची गाडी क्रमांक ०२-वायए-४४५८ डिलीवरी मॅन श्रावण बिषनोई डिलीवरी करण्यासाठी घेऊन गेला होता. तेव्हा पी ॲण्ड टी कॉलनीत पोलिसांनी त्याला अटक केली व त्याची गाडी व २५ गॅस सिलेंडर (फुल) आपल्या ताब्यात घेतले. त्याच्या दुसऱ्या ६ गाडया क्र. ०४-बीयु-७८९६, एमएच-०२-वायअे-१७६६, एमएच-०२-वायअे-७५०४, एमएच-०२-वायअे-२०५८, एमएच-०२-टी-६६६२, एमएच-०२-एक्सअे-४००७ पाईपलाईन गोडावूनमध्ये उभ्या होत्या. पोलिसांनी त्या गाडयांच्या त्यांच्याकडे नोंद करुन घेतली. पोलिसांच्या परवानगीनंतर वरील सहाही गाडया डिलीवरी करण्यासाठी त्यांच्या ताब्यात परत दिल्या. वरील सर्व गाड्या ह्या रिजन्सी गॅसच्या मालकीच्या असून सोबत गाडयांचे पेपर जोडले आहेत. वरील सर्व गाड्या सिलेंडरची डिलीवरी करण्यासाठीच वापरण्यात येतात. गाडी क्र. एमएच-०२-वायए-४४५८ अजुनही साकीनाका, मुंबई पोलिसांच्या ताब्यात आहे. सदर गाडी त्यांच्या ताब्यात देण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई यांचे दिनांक १८/०४/२०१२ टपालामार्फत प्राप्त खुलासा वजा अहवालात, पंचनाम्यामध्ये साकीनाका पोलिस ठाणेच्या हद्दीत जप्त केलेल्या मुद्देमाला व्यतिरिक्त अंजली गॅस सर्व्हिसचे कार्यालय, शॉप नं. ७०, एव्हरजॉय अपार्टमेंट, मरोळ अंधेरी, मुंबई तसेच रिजेन्सी या गॅस सिलेंडरचे गोडावून या ठिकाणी मिळून आलेले गॅस सिलेंडर व इतर वस्तू ह्या गुन्ह्याच्या पुढील तपासाचे अनुषंगाने तातपुरत्या स्वरुपात ताब्यात घेण्यात आले होते, जेंणे करुन गॅस धारकांची गैरसोय होवु नये. वरील नमूद दोन्ही ठिकाणी पंचनाम्या अंतर्गत ताब्यात घेण्यात आलेल्या गॅस सिलेंडर व इतर वस्तू यांचा नमूद गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास केला असता, त्यांचा सदर गुन्ह्याशी संबंध नसल्याचे निष्पन्न झाले म्हणून अंजली गॅस सर्व्हिसचे कार्यालय,

शॉप नं. ७०, एव्हरजॉय अपार्टमेंट, मरोळ अंधेरी, मुंबई तसेच रिजेन्सी या गॅस सिलेंडरचे गोडावून या ठिकाणी मिळून आलेले गॅस सिलेंडर व इतर वस्तू ह्या संबंधितांना परत करण्यात आलेल्या आहेत, असे नमूद केले आहे.

सबब, सदरचें प्रकरण गुणवत्तेवर निर्णयासाठी राखुन ठेवण्यात आले.

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दि.१०/०५/२०११ रोजी १५:०० वा. गुलशन इस्टेट, गाळा क्र. २५, अंधेरी घाटकोपर लिंक रोड, पेनीनसुल्ला हॉटेलच्या मागे, साकीनाका, मुंबई - ७२ येथे गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई यांचे अधिकारी व कर्मचारी तसेच दोन पंच व शिधावाटप निरिक्षक यांचेसह अवैध गॅस विक्री व साठा असल्याचे माहिती वरुन, अचानक छापा घालून घटनास्थळी असलेल्या गोडावूनमधून रिकामे व अर्धवट भरलेले गॅस सिलेंडर तसेच ३ टेंम्पो व एक मोटार सायकल असे मिळून एकूण रुपये ४,६९,६७५/- एवढया किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन साकीनाका पोलिस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. १८५/२०११, दि.११/०५/२०११ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई यांचे अभिवेदनात, पंचनाम्यामध्ये साकीनाका पोलिस ठाणेच्या हद्दीत जप्त केलेल्या मुद्देमाला व्यतिरिक्त अंजली गॅस सर्व्हिसचे कार्यालय, शॉप नं. ७०, एव्हरजॉय अपार्टमेंट, मरोळ अंधेरी, मुंबई तसेच रिजेन्सी या गॅस सिलेंडरचे गोडावून या ठिकाणी मिळून आलेले गॅस सिलेंडर व इतर वस्तू ह्या गुन्ह्याच्या पुढील तपासाचे अनुषंगाने तात्पुरत्या स्वरुपात ताब्यात घेण्यात आले होते, संबंधित गॅस धारकांची गैरसोय होवु नये म्हणून अंजली गॅस सर्व्हिसचे कार्यालय, शॉप नं. ७०, एव्हरजॉय अपार्टमेंट, मरोळ अंधेरी, मुंबई तसेच रिजेन्सी या गॅस सिलेंडरचे गोडावून या ठिकाणी मिळून आलेले गॅस सिलेंडर व इतर वस्तू ह्या संबंधितांना परत करण्यात आल्याचे नमूद आहे.

वरिष्ठ पोलिस निरीक्षक, साकीनाका पोलिस स्टेशन यांनी सादर केलेल्या अभिवेदनामध्ये साकीनाका पोलिस ठाणे शिवाय अंधेरी पोलिस ठाणे अंतर्गत मे. अंजली गॅस सर्व्हिसचे कार्यालय व गोडाऊन मधील तात्पुरत्या स्वरुपात सिल करण्यात आलेला रु. ४५,३५,०३२/- किंमतीचा मुददेमाल तसेच एम.आय.डी.सी. पोलिस ठाणे अंतर्गत मे. रिजन्सी गॅस सर्व्हिसचे कार्यालय व गोडाऊन मधील तात्पुरत्या स्वरुपात सिल करण्यात आलेला रु. २७,८१,६९८/- किंमतीचा मुद्देमाल गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई यांचे आदेशाने खोलण्यात आले. त्यानुसार ठाणे दैनंदिनी क्र. २५/२०११ दिनांक १४/०५/२०११ रोजी नोंदी घेऊन रु. ७३,१६,७३०/- किंमतीचा मुद्देमाल सिलमुक्त

करण्याची कार्यवाही करुन नमुद गुन्ह्यातील उर्वरीत शिल्लक असलेला रु.१४,६९,६७५/- किमतीचा मुद्देमाल हा आजमितीस घटनास्थळी असलेल्या गोदामात जप्त असल्याचे नमुद आहे.

प्रस्तुत प्रकरणी, साकीनाका पोलिस ठाणेच्या हद्दीतील गाळा नं. २५, गुलशन इस्टेट, अंधेरी, घाटकोपर लिंक रोड, साकीनाका, मुंबई - ७२ या ठिकाणी असलेल्या अनधिकृत गोदामात घरगुती वापरण्यात येणाऱ्या सिलेंडरच्या टाकीमधून वॉलच्या सहाय्याने गॅस काढून सदरचा गॅस व्यवसायीक टाकीमध्ये भरुन सदर टाक्या गिऱ्हाईकांना विक्रीसाठी तयार करुन ठेवले असल्याचे तसेच सदर ठिकाणी घरगुती वापरण्यात येणाऱ्या सिलेंडरचा दोन टाक्यामधून वॉलच्या सहाय्याने गॅस काढुन तिसऱ्या घरगुती वापरण्यात येणाऱ्या टाकीमध्ये कमी प्रमाणात गॅस भरुन सदर टाक्या गिऱ्हाईकांना विक्रीसाठी तयार करुन सदर ठिकाणी विनापरवाना गॅस सिलेंडर रिफेलिंग करण्याचे अनधिकृत काम चालू असल्याच्या मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने पोलिस पथक उक्त ठिकाणी प्रवेश केला असता, सदर गाळ्यामध्ये उत्तरेस तोंड करुन टेम्पो क्र. एमएच-०३-अेएच-१२९२ उभा असल्याचे दिसुन आले. तसेच त्या ठिकाणी उपस्थित इसम नामे मोहम्मद इसाक मोहम्मद इर्षाद खान, सिकंदर अस्लम खान व मंहमद अतिक मोहम्मद अक्रम खान हे अनधिकृतरित्या व्यवसायीक गॅस टाकी खाली ठेवून त्या टाकीच्या तोंडामध्ये लोंखडी वॉल टाकून वॉलच्या तोंडास घरगुती वापरण्यात येणारे भरलेले सिलेंडर उलटे करुन घरगुती वापरणात येणारा सिलेंडरच्या टाकीमधून गॅस व्यवसायीक सिलेंडरमध्ये भरुन त्याच्या तोंडास एच.पी. कंपनीचे बनावट प्लास्टिक सिल गरम पाणी टाकून चिटकवित असतांना तसेच घरगुती वापराच्या भरलेल्या सिलेंडरमधून घरगुती वापराच्याच रिकाम्या सिलेंडरमध्ये वॉलच्या सहाय्याने गॅस भरत असतांना पोलिस पथकाने रंगेहाथ पकडले आहे. सदर कारवाई चालू असतांना मे. रिजन्सी गॅस या एजन्सीचे गोपाळ भाकरराम बिषनोई व रामस्वरुप बलवंतराम बिषनोई नामे इसम हे थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-४४५८ मधुन २५ घरगुती वापरण्यात येणाऱ्या गॅस सिलेंडरच्या भरलेल्या टाक्या घेऊन आले व ते टेम्पोमधील भरलेल्या गॅस सिलेंडरच्या टाक्या गोडावूनमध्ये खाली करु लागले, सदर दोन्ही इसम व वर नमूद गाळ्यामधील तीन इसम यांना सदर गॅस सिलेंडरबाबत कागदपत्रांची विचारणा केली असता, त्यांच्याकडे कसलीही कागदपत्रे मिळून आली नाहीत. सदर कारवाई चालू असतांना मे. अंजली गॅस सर्व्हिस या एजन्सीचा थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०३-एन-८८९८ चा चालक हा घरगुती वापराच्या २१ सिलेंडरच्या टाक्या भरुन घटनास्थळी आला असता, सदर टेम्पो चालक पोलिसांना बघून टेम्पो गोडावून समोर उभा करुन पळून गेला. पोलिस पथकाने केलेल्या तपासणीत सदर गोडावूनमध्ये गॅस सिलेंडरमध्ये भरण्याकामी लागणारे साहित्य व इतर मुद्देमाल मिळून आला. तद्नंतर मोहम्मद अतिक मोहम्मद अक्रम खान याने पंचासमक्ष दिलेल्या जबाबात नमुद गोडावूनमध्ये मिळालेले भारत गॅसचे सिलेंडर त्याने अंजली गॅस सर्व्हिस व रिजन्सी गॅस सर्व्हिस या दोन्ही गॅस एजन्सीच्या गोडावूनमधून अनधिकृत खरेदी केल्याचे तसेच मे. अंजली गॅस सर्व्हिस येथे काम करणारा डिलिव्हरी

सुपरवायझर चेतन गोविंद तुरकुडे हा त्यास पाहिजे तेवढे सिलेंडर देत असल्याचे नमुद आहे. तदनंतर पोलिस पथकाने चेतन गोविंद तुरकुंडे यास बोलावून घेतले असता, चेतन गोविंद तुरकुंडे हे मोटार सायकल क्र. एमएच-०३-अेक्यु-७०१४ घेऊन घटनास्थळी उपस्थित झाले व ते नेहमीच मोहम्मद अतिक मोहम्मद अक्रम खान यास सिलेंडर देत असल्याचे पंचांसमक्ष कबूल केले आहे. तसेच रामस्वरुप बिषनोई व श्रावण बिषनोई यांच्याकडे अधिक विचारपूस केली असता, ते रिजन्सी गॅस सर्व्हिस या गॅस एजन्सीमध्ये काम करीत असून सदरचे सिलेंडर त्यांनी रिजन्सी गॅस एजन्सीच्या मरोळ पाईप लाईन येथे गोडावूनमधून आणले असल्याचे कबुल केले आहे. सदर गाळ्याचे मालक नामे राममिलन हरिशंकर शुक्ला यांनी त्यांचे गोडावून फिरोज नामे इसमास दहा दिवसांपूर्वी गॅस रिफीलिंग करण्यासाठी १०,०००/- रुपये महिन्याने भाडयाने दिले असल्याचे सांगितले. त्यास सदरचे गॅस रिफिलिंग करण्याचे काम अवैध व मानवी जीवनास धोका निर्माण होईल हे माहित असतांना सुध्दा त्याने गोडावून कोणताही करारनामा न करता फिरोज यास भाडयाने दिले व गुन्हा करण्यास मदत केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते.

मे. रिजन्सी गॅस सर्व्हिसचे भागीदार नरेंद्र तेजवानी यांनी त्यांच्या अधिपत्याखालील डिलेव्हरीमॅन श्रावण बळवंतराम बिषनोई आणि त्याचा मदतनिस गोपाळ भाकरराम बिषनोई यांच्या ताब्यात असलेला त्यांच्या मालकीचा टेम्पो क्र. ०२-वायअे-४४५८ व त्यामधील २५ घरगुती वापराचे भरलेले सिलेंडरचा साठा हा जप्त केल्याचे मान्य केले आहे. तसेच मे. अंजली गॅस सर्व्हिसचे मालक सुरेश प्रभाकर बर्डे यांनीही घटनास्थळी त्यांच्या अधिपत्याखालील थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०३-एन-८८९८ व त्यामधील २१ घरगुती वापराचे सिलेंडरचा साठा हा अनधिकृत गोदामामध्ये त्यांच्या नोकराने त्यांना माहित नसताना बेकायदेशिररित्या देण्यात आल्याची बाब मान्य केली आहे. तसेच नमुद दोन्ही गॅस एजन्सीच्या मालकाने सदरचे जप्त करण्यात आलेला सिलेंडर्सचा साठा हा त्यांना परत मिळण्याची विनंती केली. यावरुन त्यांच्या अधिपत्याखालील कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्षात उपभोक्तास वितरणासाठी देण्यात आलेला अनुदानीत घरगुती वापराचा सिलेंडर्सचा साठा हा अनधिकृत गोदामातील इसमांशी संगनमत करुन अवैध विक्री केल्याचे सिध्द होत आहे. मे. रिजन्सी गॅस व मे. अंजली गॅस सर्व्हिसचे मालक यांना वितरक म्हणुन त्यांना संलग्न असलेल्या गॅस ग्राहकांना अनुदानीत सिलेंडर्सच्या पुरवठयाकरीता मे. बीपीसीएल या भारतीय सरकारचे अंगिकृत असलेल्या कंपनीने करारबध्द केले आहे. तथापी, नमुद दोन्ही गॅसवितरक यांनी नेमणुक केलेल्या तसेच त्यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांमार्फत सदर गॅस सिलेंडर्सचा पुरवठा त्यांच्याकडे नोंदणीकृत असलेल्या गॅस ग्राहकांना प्रत्यक्षात वितरण करण्याची त्यांची जबाबदारी असुन व त्याकरीता त्यांनी सर्वोतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. परंतु सदर गुन्हा नोंद प्रकरणी मे. रिजन्सी गॅस व मे. अंजली गॅस सर्व्हिस यांच्याकडून अनुदानीत दराने वितरीत होणारे घरगुती वापराचे सिलेंडरचे वितरण प्रत्यक्षात उपभोक्ता यांना न होता. तो गैरमार्गाने व नफेखोरीच्या उद्देशाने विकला असल्याने पोलिसांनी घटनास्थळी जप्त केलेले आहे. यावरुन मे



001

CONTROLLER OF RATIONING & ... HEAD OFFICE MUMBAI

रिजन्सी गॅस व मे. अंजली गॅस सर्व्हिस यांनी सादर केलेले निवेदन हे मोघम स्वरुपाचे व शासनाची दिशाभूल करणारे आहे. प्रस्तुत प्रकरणी मे. रिजन्सी गॅस व मे. अंजली गॅस सर्व्हिस या दोन्ही वितरकांचाही सहभाग असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असल्याने नमुद गुन्हयात घटनास्थळी जप्त करण्यात आलेले मे. रिजन्सी गॅस यांचे घरगुती वापराचे २५ सिलेंडर व मे. अंजली गॅस सर्व्हिस यांचे घरगुती वापराचे २१ सिलेंडरचा संपुर्ण साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत आलेली आहे.

तथापी, राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य यांचे दिनांक २३/०५/२०१२ रोजीच्या पत्रान्वये " The seized LPG cylinder is a property of the Oil companies and therefore the premise of depositing money against the seized cylinder is not possible " असे नमूद असल्याने विविध धाडींमध्ये जप्त करण्यात आलेल्या तेल कंपन्यांचा गॅस सिलेंडरचा साठा हा संबंधित तेल कंपन्यांची मालमत्ता आहे. सबब, शासनजमा केलेल्या गॅस सिलेंडरच्या साठ्याची आकारण्यात आलेली रक्कम वसूल करणे शक्य नसल्याने सदरचा जप्त गॅस सिलेंडरचा साठा हा राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य यांच्या मदतीने संबंधित तेल कंपन्यांना बंधपत्र घेऊन देण्यात यावा.

प्रस्तुत प्रकरणी, घटनास्थळी असलेल्या अनधिकृत गोदामातुन जप्त करण्यात आलेल्या सिलेंडर्सच्या एकुण साठयापैकी मे. एलजी कंपनी व मे. गॅस पॉईंट कंपनी या समांतर बाजारपेठेतील कंपन्यांचा विनाअनुदानीत असलेला सिलेंडर्सचा साठा व हिंदुस्थान पेट्रोलियम व भारत पेट्रोलियम कंपनीच्या व्यावसायीक वापराचे तसेच घटनास्थळी जप्त करण्यात आलेले टेंम्पो क्र. एमएच-०३-एएच-१२९२ मधील भारत पेट्रोलियम कंपनीचे घरगुती वापराचा सिलेंडर्सचा साठा जप्त असुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल कोणीही पुरावादर्शक कागदपत्रे सादर केले नाही अथवा सदर साठयाच्या मालकीचाही कोणी दावा केलेला नाही. घटनास्थळी कार्यरत असलेला अनधिकृत व्यवसायक हा अनुदानीत दराच्या सिलेंडर मधील गॅसचा साठा हा सदरच्या विनाअनुदानीत अथवा व्यावसायीक दराच्या सिलेंडरमध्ये धोकादायकरित्या भरत असल्याचे सिध्द झाले आहे. ज्याअर्थी मे. एलजी कंपनी व मे. गॅस पॉईंट कंपनीच्या रिकामे सिलेंडर्सचा साठा घटनास्थळी आढळून आला आहे त्याअर्थी अनधिकृत गोदाम असलेल्या विभागातील नमुद दोन्ही खाजगी कंपन्यांच्या तथाकथीत वितरकांचाही सदर गैरकृत्यामध्ये सहभाग असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. तसेच घटनास्थळी उपस्थित आरोपी मोहम्मद अतीक मोहम्मद अक्रम ख़ान याने त्याचे गोडावुनमध्ये मिळालेले भारत गॅसचे सिलेंडर्स त्याने अंजली गॅस सर्व्हिस व रिजन्सी गॅस या दोन्ही गॅस एजन्सीच्या गोडावुनमधुन आणल्याचे कबुल केले आहे. तथापी, नमुद दोन्ही गॅस वितरकांनी टेंम्पो क्र. एमएच-०३-एएच-१२९२ मधील भारत पेट्रोलियम कंपनीच्या घरगुती वापराच्या २२ सिलेंडर्सच्या साठयाच्या मालकीचा दावा केलेला नसल्याने तसेच जप्त केलेल्या गॅस सिलेंडर्सबाबत कोणतेही अधिकृत कागदपत्रे अथवा पुरावे सादर केले नसल्याने सदरचे गॅस सिलेंडर सर्व संबंधितांनी आपापसात संगणमत करुन स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी गैरव्यवहार करण्याच्या उद्देशाने

अनधिकृतपणे खरेदी/विक्री केले असल्याचे दिसून येते. सबब, सद्यःस्थितीत सकृतदर्शनी दिसून येत असलेल्या वस्तुस्थितीवरुन प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेले मे. एल जी या कंपनीचे २० सिलेंडर्स व मे. गॅस पॉईंट या कंपनीचे ३५ सिलेंडर्स तसेच हिंदुस्थान पेट्रोलियम या कंपनीचे व्यावसायीक वापराचे ५ सिलेंडर व भारत पेट्रोलियम कंपनीचे घरगुती वापराचे २२ व व्यावसायीक वापराचे २ सिलेंडर्सचा संपुर्ण साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी, मे. रिजेन्सी गॅसचे मालक नरेंद्र लाल तेजवानी यांनी केलेल्या खुलाशात, टेंम्पो क्रमांक एमएच-०२-वायए-४४५८ ही त्यांच्या मालकीची असल्याचे सांगुन सदर गुन्ह्यात जप्त असलेले त्यांचे टेंम्पो अजुनही पोलिसांच्या ताब्यात असल्याने सदर टेंम्पो त्यांच्या ताब्यात देण्याची विनंती केली. तथापी, पोलिसांनी केलेल्या कार्यवाहीच्या पंचनाम्यानुसार कारवाई चालू असतांना सदर थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-४४५८ गोडावून समोर घरगुती वापरण्यात येणाऱ्या गॅस सिलेंडरच्या भरलेल्या टाक्या घेऊन येवून दोन इसम टेम्पोमधील भरलेल्या गॅस सिलेंडरच्या टाक्या गोडावूनमध्ये खाली करीत असतांना जप्त केले आहे. यावरुन मे. रिजेन्सी गॅसच्या मालकीचा टेंम्पो क्र. एमएच-०२-वायए-४४५८ हा चालक/डिलेव्हरी बॉयने शासन नियंत्रित दराचे सिलेंडर गॅस ग्राहकांकडे वितरणासाठी न जाता गैरमार्गाने सदरचा अनधिकृत गोदामात अवैधरित्या सिलेंडरचे वितरण करुन सदर टेंम्पोचा अवैध वाहतुकीसाठी गैरवापर केला असल्याचे सिध्द होत आहे.

लक्ष्मण गोविंद तुरकुंडे हे हिरो होंडा मोटार सायकल क्र. एमएच-०३-अेक्यु-७०१४ चे मालक म्हणून त्यांनी त्यांच्या मालकीची असलेली हिरो होंडा मोटर सायकल साकीनाका पोलिस ठाणे यांच्या हद्दीत जप्त करण्यात आली होती. ती त्यांना परत मिळण्याची विनंती केली. तथापी, पोलिसांनी घटनास्थळी आरोपी मोहम्मद अतिक मोहम्मद अक्रम खान याने दिलेल्या जबाबानुसार मे. अंजली गॅस सर्व्हिस येथे डिलिव्हरी सुपरवायझर म्हणुन काम करणारा लक्ष्मण गोविंद तुरकुंडे यांचा भाऊ चेतन गोविंद तुरकुंडे हा त्यास पाहिजे तेवढे सिलेंडर देत असल्याने पोलिसांनी चेतन गोविंद तुरकुंडे यास घटनास्थळी बोलावून विचारणा केली असता त्यानेही नेहमीच मोहम्मद अतिक मोहम्मद अक्रम खान यास सिलेंडर देत असल्याचे कबूल केले. सबब, सदर गैरकृत्यासाठी चेतन गोविंद तुरकुंडे याने लाल रंगाची हिरो होंडा कंपनीची मोटार सायकल क्र. एमएच-०३-अेक्यु-७०१४ या मोटार सायकलचा गैरवापर केला असल्याचे सिध्द होत आहे.

टेंम्पो क्र. एमएच-०३-एन-८८९८ चे मालक गोविंद वामन तुरकुंडे यांचे दिनांक ३१/०३/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, त्यांची प्रकृती ठिक नसल्याने त्यांना दवाखान्यात दाखल करण्यात आल्याचे नमुद असुन त्यामुळे त्यांना सुनावणीस उपस्थित राहता आले नाही तरी त्यांनी सुनावणीची पुढील तारीख मिळण्यास विनंती केली. तथापी, गोविंद वामन तुरकुंडे हे त्यापूर्वी अथव त्यानंतर झालेल्या सुनावणीसही उपस्थित राहीले नाहीत

व टेंम्पो क्र. एमएच-०३-अेएच-१२९२ या टेंम्पोच्या मालकासही सुनावणीस उपस्थित राहण्याची संधी देवून देखील ते उपस्थित राहीले नाहीत अथवा सदरच्या दोन्ही टेंम्पोच्या मालकीचा दावाही केलेला नाही. तथापी, टेंम्पो क्र. एमएच-०३-अेएच-१२९२ हा घटनास्थळी पोलिसांनी भारत गॅस कंपनीच्या घरगुती वापराच्या २२ सिलेंडर्स सहीत जप्त केले असुन पोलिस पथकाने घटनास्थळी असलेल्या गोदामात प्रवेश केला असता प्रथमदर्शनी सदर टेंम्पो व त्यामधील अनधिकृत सिलेंडर्सचा साठा हा सर्वप्रथम जप्त केल्याचे तसेच टेंम्पो क्र. एमएच-०३-एन-८८९८ या टेंम्पोचाही सदर गैरकृत्यामध्ये अवैध वाहतुकीसाठी गैरवापर केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. प्रस्तूत प्रकरणी जप्त दोन्ही टेंम्पोचे मालक, यांना त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता पुरेशी संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित राहीले नाही. यावरुन जप्त दोन्ही टेंम्पोचे मालक यांना याबाबत काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे तसेच जप्त मुद्देमाल परत मिळण्यासंदर्भात कसलेही स्वारस्य नसल्याचे व नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येते.

प्रस्तुत प्रकरणी, टेंम्पो क्र. एमएच-०३-एन-८८९८ व टेंम्पो क्र. एमएच-०३-अेएच-१२९२ चे मालक यांना पुरेशी संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित न राहिल्याने त्यांना याबाबत काहीही सांगावयाचे नसुन त्यांना सदरचे आरोप मान्य असल्याचे दिसुन येते. तसेच मे. रिजेन्सी गॅसचे मालक नरेंद्र लाल तेजवानी यांच्या मालकीचा टेंम्पो क्रमांक एमएच-०२-वायए-४४५८ व लक्ष्मण गोविंद तुरकुंडे यांच्या मालकीचे हिरो होंडा मोटार सायकल क्र. एमएच-०३-अेक्यु-७०१४ या दोन्ही वाहनांचे मालकांनी सुनावणीस उपस्थित राहुन सदरचे वाहने त्यांना परत मिळण्याबाबत विनंती केली. तथापी, सदरचे सर्व वाहनांचा वापर बेकायदेशीर व अनधिकृत सिलेंडर साठयाच्या वाहतुकीकरीता अथवा अवैध व्यवसायाकरीता केला असल्याचे सिध्द होत असुन प्रस्तुत प्रकरणी जरी वाहनांच्या मालकांच्या अपरोक्ष सदरचा गुन्हा घडला असला तरी, मालक या नात्याने त्यांचे वाहनांचा गैरवापर होणार नाही याची सर्वेतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदरचे जप्त करण्यात आलेले टेंम्पो क्र. एमएच-०३-एन-८८९८, टेंम्पो क्र. एमएच-०३-अेएच-१२९२ व टेंम्पो क्रमांक एमएच-०२-वायए-४४५८ तसेच हिरो होंडा मोटार सायकल क्र. एमएच-०३-अेक्यु-७०१४ हे त्यांच्या बाजारमुल्या एंवढीं प्रत्येकी रक्कम भरण्यास वाहनांचे मालक तयार असल्यास, तेवढी प्रत्येकी रक्कम भरल्यानंतर सदरची वाहने त्यांच्या मालकांस परत करण्याच्या अथवा वाहनांचे मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

0020 सदर गुन्हयात घटनास्थळी जप्त करण्यात आलेले गॅस भरण्यासाठी लागणारे साहित्य वाहून नेण्यासाठी २ ॲटलॅस कंपनीच्या सायकली व एक सिंगल बर्नर असलेली गॅस शेगडी या वस्तु किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

तसेच नमुद गुन्हयात उर्वरीत जप्त करण्यात आलेले गॅस भरण्यासाठी लागणारे साहित्य म्हणुन १२ किलो वजनाचे गॅस भरण्यासाठी लागणारे ४ रिफीलिंग मशीन, १४ किलो वजनाचे गॅस भरण्यासाठी लागणारे १४ रिफीलिंग मशिन, SKN इंडस्ट्रिज या कंपनीचे पाईप जोडलेले रेग्युलेटर, एच.पी. कंपनीचे प्लॅस्टिक पेपरचे ५० सिल, काळ्या रंगाचे ५० रबरी वॉल तसेच बी.पी. कंपनीचे पांढ्या रंगाचे प्लॅस्टिकचे २५ सिल इ. वस्तु या अवैध व्यवसायासाठी वापरण्यात आलेली बनावट वस्तु असुन सदर मुद्देमाल हा किरकोळीने विक्री केल्यास त्याचा पुन्हा गैरवापर होण्याची साशंकता असल्याने सदरचा मुद्देमाल हा कायमस्वरुपी जप्त करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६- अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये साकीनाका पोलिस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १८५/२०११ दिनांक ११/०५/२०११ अन्वये गुन्हा नोंद मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**<u>आदेश :-</u>**

१) जप्त करण्यात आलेले भारत पेट्रोलियम कार्पोरेशन कंपनीचे घरगुती वापराचे ४९ भरलेले व १९ रिकामे असे एकूण ६८ गॅस सिलेंडर्सचा साठा शासनजमा करण्यात यावा.

२) जप्त करण्यात आलेले भारत पेट्रोलियम कार्पोरेशन कंपनीचे औद्योगीक वापराचे १९ कि.ग्रॅ. वजनाचे २ रिकामे गॅस सिलेंडर्सचा साठा शासनजमा करण्यात यावा.

३) जप्त करण्यात आलेले हिंदुस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन कंपनीचे औद्योगीक वापराचे १९ कि.ग्रॅ. वजनाचे ५ रिकामे गॅस सिलेंडर्सचा साठा शासनजमा करण्यात यावा.

४) सदर शासनजमा करण्यात आलेले संपुर्ण गॅस सिलेंडर्सचा साठा पोलिसांनी राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १०, पी डि मेलो रोड, वाडीबंदर, मुंबई यांचे मदतीने मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन व मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन यांना बंधपत्र घेऊन देण्यात यावा.

५) जप्त करण्यात आलेले मे. एल.जी. कंपनीचे १४ कि.ग्रॅ. वजनाचे २ भरलेले, १२ कि.ग्रॅ. वजनाचे १० रिकामे, १७ कि.ग्रॅ. वजनाचे ७ रिकामे व १४ कि.ग्रॅ. वजनाचा १ रिकामा असे एकुण २० गॅस सिलेंडर्सचा साठा शासनजमा करण्यात यावा.

६) जप्त करण्यात आलेले मे. गॅस पॉईंट कंपनीचे १२ कि.ग्रॅ. वजनाचा १ भरलेला, १२ कि.ग्रॅ. वजनाचे २२ रिकामे, १५ कि.ग्रॅ. वजनाचे ५ रिकामे व १७ कि.ग्रॅ. वजनाचे ७ रिकामे असे एकुण ३५ गॅस सिलेंडर्सचा साठा शासनजमा करण्यात यावा.

७) सदर शासनजमा करण्यात आलेले संपुर्ण गॅस सिलेंडर्सचा साठा पोलिसांनी मे. एल.जी. कंपनी व मे. गॅस पॉईंट कंपनी या कंपन्यांना देवून त्यापोटी येणारी रक्कम शासनजमा करण्यात यावी.

८) सदरचे जप्त करण्यात आलेले टेंम्पो क्र. एमएच-०३-एन-८८९८, टेंम्पो क्र. एमएच-०३-अेएच-१२९२ व टेंम्पो क्रमांक एमएच-०२-वायए-४४५८ तसेच हिरो होंडा मोटार सायकल क्र. एमएच-०३-अेक्यु-७०१४ ही वाहने शासनजमा करण्यात येत आहेत. सदर वाहनांच्या बाजारमुल्या एवढी प्रत्येकी रक्कम भरण्यास वाहनांचे मालक तयार असल्यास, तेवढी प्रत्येकी रक्कम भरल्यानंतर सदरची वाहने त्यांच्या मालकांस परत करण्यात यावीत व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी संबंधित वाहनांच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

९) अशा वाहनांचे मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास सदर वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरची वाहने लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

१०) जप्त करण्यात आलेले गॅस भरण्यासाठी लागणारे साहित्य वाहून नेण्यासाठी २ ॲटलॅस कंपनीच्या सायकली व एक सिंगल बर्नर असलेली गॅस शेगडी पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

११) जप्त करण्यात आलेले १२ किलो वजनाचे गॅस भरण्यासाठी लागणारे ४ रिफीलिंग मशीन, १४ किलो वजनाचे गॅस भरण्यासाठी लागणारे १४ रिफीलिंग मशिन, SKN इंडस्ट्रिज या कंपनीचे पाईप जोडलेले रेग्युलेटर, एच.पी. कंपनीचे प्लॅस्टिक पेपरचे ५० सिल, काळ्या रंगाचे ५० रबरी वॉल तसेच बी.पी. कंपनीचे पांढऱ्या रंगाचे प्लॅस्टिकचे २५ सिल इ. वस्तु कायमस्वरुपी जप्त करुन शासनजमा करण्यात यावी.

५) जप्त करण्यात आलेले मे. एल.जी. कंपनीचे १४ कि.ग्रॅ. वजनाचे २ भरलेले, १२ कि.ग्रॅ. वजनाचे १० रिकामे, १७ कि.ग्रॅ. वजनाचे ७ रिकामे व १४ कि.ग्रॅ. वजनाचा १ रिकामा असे एकुण २० गॅस सिलेंडर्सचा साठा शासनजमा करण्यात यावा.

६) जप्त करण्यात आलेले मे. गॅस पॉईंट कंपनीचे १२ कि.ग्रॅ. वजनाचा १ भरलेला, १२ कि.ग्रॅ. वजनाचे २२ रिकामे, १५ कि.ग्रॅ. वजनाचे ५ रिकामे व १७ कि.ग्रॅ. वजनाचे ७ रिकामे असे एकुण ३५ गॅस सिलेंडर्सचा साठा शासनजमा करण्यात यावा.

७) सदर शासनजमा करण्यात आलेले संपुर्ण गॅस सिलेंडर्सचा साठा पोलिसांनी मे. एल.जी. कंपनी व मे. गॅस पॉईंट कंपनी या कंपन्यांना देवून त्यापोटी येणारी रक्कम शासनजमा करण्यात यावी.

८) सदरचे जप्त करण्यात आलेले टेंम्पो क्र. एमएच-०३-एन-८८९८, टेंम्पो क्र. एमएच-०३-अेएच-१२९२ व टेंम्पो क्रमांक एमएच-०२-वायए-४४५८ तसेच हिरो होंडा मोटार सायकल क्र. एमएच-०३-अेक्यु-७०१४ ही वाहने शासनजमा करण्यात येत आहेत. सदर वाहनांच्या बाजारमुल्या एवढी प्रत्येकी रक्कम भरण्यास वाहनांचे मालक तयार असल्यास, तेवढी प्रत्येकी रक्कम भरल्यानंतर सदरची वाहने त्यांच्या मालकास परत करण्यात यावीत व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी संबंधित वाहनांच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

९) अशा वाहनांचे मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास सदर वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरची वाहने लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

१०) जप्त करण्यात आलेले गॅस भरण्यासाठी लागणारे साहित्य वाहून नेण्यासाठी २ ॲटलॅस कंपनीच्या सायकली व एक सिंगल बर्नर असलेली गॅस शेगडी पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

११) जप्त करण्यात आलेले १२ किलो वजनाचे गॅस भरण्यासाठी लागणारे ४ रिफीलिंग मशीन, १४ किलो वजनाचे गॅस भरण्यासाठी लागणारे १४ रिफीलिंग मशिन, SKN इंडस्ट्रिज या कंपनीचे पाईप जोडलेले रेग्युलेटर, एच.पी. कंपनीचे प्लॅस्टिक पेपरचे ५० सिल, काळ्या रंगाचे ५० रबरी वॉल तसेच बी.पी. कंपनीचे पांढऱ्या रंगाचे प्लॅस्टिकचे २५ सिल इ. वस्तु कायमस्वरुपी जप्त करुन शासनजमा करण्यात यावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मोहम्मद इसाक मोहम्मद इर्शाद खान उर्फ पठाण
२) सिकंदर अस्लम खान
३) मंहमद अतिक मोहम्मद अक्रम खान
४) टेम्पो क्र. एमएच-०३-अेएच-१२९२ चे मालक
५) थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-४४५८ चे मालक
६) श्रावण बळवंतराम बिषनोई (गोपाळ भाकरराम बिषनोई)
७) रामस्वरुप बळवंतराम बिषनोई
८) थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०३-एन-८८९८ चे मालक
९) थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०३-एन-८८९८ चे चालक
१०) अंजली गॅस सर्व्हिसचे मालक
११) अंजली गॅस सर्व्हिसचे मॅनेजर दिलीप जयंतीलाल अडीया
१२) रिजन्सी गॅस सर्व्हिसचे मालक
१३) रिजन्सी गॅस सर्व्हिसचे मॅनेजर सुनिल पारसनाथ सिंग
१४) अंजली गॅस सर्व्हिसमधून गॅस डिलिव्हरी देणारा इसम चेतन गोविंद तुरकुंडे
१५) गाळ्याचे मालक राममिलन हरिशंकर शुक्ला
१६) फिरोज
१७) हिरो होंडा मोटार सायकल क्र. एमएच-०३-अेक्यु-७०१४ चे मालक
१८) ट्रक क्र.एमएच-०४-बीयु-७८९६ चे मालक
१९) थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-वायअे-१७६६ चे मालक
२०) टेम्पो क्र.एमएच-०२-वायअे-७५०४ चे मालक
२१) थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-वायअे-२०५८ चे मालक
२२) थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-टी-६६६२ चे मालक
२३) थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-एक्सअे-४००७ चे मालक
२४) हर्शद अहमद सिध्दीकी

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलिस स्टेशन, मुंबई यांचे मार्फत)

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR
HEAD OFFICE
MUMBAI

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, साकीनाका पोलिस स्टेशन, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गुन्हे नियंत्रण शाखा, मुंबई यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.

३) विभागीय व्यवस्थापक, मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.

४) विभागीय व्यवस्थापक, मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.

५) राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १० पी डिमेलो रोड, वाडी बंदर, मुंबई-४०० ०१० (दुरध्वनी क्र. ०२२-३७५८१३०) यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

६) मे. एल.जी. गॅस कंपनी, मुंबई.

७) मे. गॅस पॉईंट कंपनी, मुंबई.

८) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

९) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.